चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२१ एप्रिल, २०२०

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# दैनंदीन कर्तव्य बजावुन पोलीस कर्मचारी यांनी घरीच मास्क तयार करून केले वाटप

कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव थाबंविण्यासाठी पोलीस विभाग, आरोग्य विभाग आणि इतर अत्यावश्यक सेवा देणारे विभाग अहोरात्र मेहनत घेत आहे. यातच चंद्रपुर जिल्हयातील चंद्रपुर शहर पोलीस स्टेशन येथे कार्यरत पोलीस हवालदार बळीराम पवार हे आपले कर्तव्य बजावुन आपल्या घरी पत्नी परिवारासह गरजु लोकांसाठी मास्क तयार करीत आहे. बळीराम पवार आणि त्यांची पत्नी यांनी आतापर्यंत २५०० मास्क तयार करून गरजु लोकांना वाटप केले आहे.

तसेच त्यांचे सहकारी चंद्रपुर जिल्हयातील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी सुध्दा मास्क तयार करून त्यांना वाटप केले आहे. त्याचबरोबर ते आपले कर्तव्य बजावित असतांना कोणतीही व्यक्ती जे मास्क न लावता घरा बाहेर पडतात त्यांना सुध्दा मास्क वाटप केले आहे. पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेडड्ी यांनी त्यांच्या या कार्याबाबत त्यांचे आणि त्यांचे परिवाराचे कौतुक केले आहे.

---